रिझर्व्ह बँकेचे नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे सरव्यवस्थापक व त्यांचे अधिकारी, विभागीय सहनिबधंक, मा. जिल्हा उपनिबंधक श्री नानासाहेब चव्हाण, मा.श्री.राठोड साहेब, मा. श्री. घोंगे साहेब, सहाय्यक निबंधक श्री. साबळे साहेब, सहकार खात्यातील अन्य अधिकारी तसेच रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी श्री किशोरजी शहा साहेब यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. बुलडाणा जिल्हा सहकारी बँकेचे मा. प्रशासक, सरव्यवस्थापक व शाखाधिकारी यांचे सहकार्याबद्दल आभारी आहे.

बँकेचे ठेवीदार, सभासद बंधू, भगिनी, सार्वजनिक संस्थाचे विश्वस्त, हितचिंतक, नागरी सहकारी पतसंस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी यांचे सहकार्य बँकेला सतत लाभत आहे. बँकेच्या आतापावेतो प्रगतीत या सर्वाचा सहभाग आहे. या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

बँकेचे सरव्यवस्थापक श्री. सं. शं. भंगिरे, मुख्य कार्यालयातील जेष्ठअधिकारी व इतर सर्व अधिकारी, शाखाधिकारी तथा सर्व कर्मचारी वृंद यांनी आपआपली जबाबदारी निष्ठेने, आत्मीयतेने व उत्कृष्ठपणे पार पाडली त्याबद्दल संचालक मंडळाचे वतीने मी समाधान व्यक्त करतो.

रिझर्व्ह बँकेच्या धोरणानूसार बँकेला एकूण ठेवीच्या १९.५० टक्के रकमेची सरकारी रोखे खरेदी करणे आवश्यक आहे. ३१-०३-२०१८ पर्यत आपल्या बँकेने २७०८४.७५ लाख रूपयांची रोख्यात गुंतवणूक केलेली आहे.

रिझर्व्ह बँकेने ठरवुन दिलेल्या भांडवल पर्याप्तता निकषाचे (सी.आर.ए.आर.) प्रमाण ९ टक्के आहे. त्याची पूर्तता बँकेने नियमानूसार पूर्ण केलेली आहे. या वर्षी हे प्रमाण १२.४१ टक्के आहे .हे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व सभासदांनी बँकेचे जास्तीचे भाग भांडवल खरेदी करून भांडवल वाढविण्यास मदत करावी ही विनंती.

रिझर्व्ह बँकेच्या धोरणानूसार (एन.पी.ए. उत्पन्न क्षमता नसलेले बाबतचे)वेळोवेळी आलेल्या परिपत्रकानूसार कर्जदाराने उचल केल्यापासून ९० दिवसाचे आत कर्जाचे (त्रैमासिक) व्याज, कर्जाचा हप्ता नियमित जमा न केल्यास तसेच खात्यात नावे पडलेल्या रकमेएवढी रक्कम जमा न केल्यास, खात्यात उलाढाल नसल्यास, नजरगहाण खात्याबाबत नियमित दरमहा साठापत्रके बँकेस सादर केलेले नसल्यास असे खाते उत्पन्न क्षमता नसलेले खाते समजण्यात येते. अशा खात्याची तरतुद रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या प्रमाणात करावी लागते. कर्जदाराच्या कर्ज खात्यांची माहीती रिझर्व बँकेच्या निर्देशनुसार क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीच्या साईटवर अपलोड करण्यात येत आहे. यामुळे कर्जदाराचे कर्ज खात्याची माहीती इतर बँकांना सहज उपलब्ध होत आहे त्यामुळे खाते नियमीत ठेवण्यात यावे.

या धोरणाची अंमलबजावणी दि. ३१-०३-२००४ पासून अंमलात आणली आहे. बँकेने दि. ०१-०४-२००३ पासुन कर्ज खात्यावर दरमहा व्याज आकारणी सुरू केली आहे. तसेच दि. ०१-०४-२०१० पासून बचत खात्यावर दैनिक जमा रकमेवर व्याज आकारणी सुरू केली आहे याची सभासदांनी नोंद घ्यावी.